## माओवादी राज्य

खैरलांजी खेड्यातील चार बौद्ध व्यक्तींची हत्या झाल्याचा माओवादी संघटनांनी निषेध केला आहे. माओवादी संघटनेच्या सर्वोच्च 'युनिटी कॉंग्रेस'ने याबाबत चक्क ठरावच पास केला. तिबेट आणि कम्बोडिया या दोन देशांतील लक्षावधी बौद्ध बांधवांची तनिर्घृण कत्तल करणाऱ्या माओवादी विचारांच्या लोकांनी खैरलांजी खेड्यातील चार बौद्धांच्या हत्येचा निषेध करावा याला हास्यास्पद प्रकारच म्हणावे लागेल. ढोंगीपणाचा हा जागतिक विक्रम असावा, असे समजणे गैर ठरणार नाही. बौद्ध धर्मगुरू दलाई लामा यांना निर्वासिताचे जीवन जगणे भाग पाडणाऱ्या माओवाद्यांनी बौद्ध बांधवांची दिशाभूल करण्याचा प्रयत्न आता थांबविलेलाच बरा.

देशातील फार मोठ्या भूभागात माओवादी दहशतवाद्यांनी उच्छांद मांडला आहे. गरीब, निरक्षर आदिवासीपासून अगदी उच्च शिक्षित धनिक वर्गातील अनेक व्यक्ती या माओवादी साम्यवादी विचारांच्या प्रभावाखाली आहेत. भारतातील माओवादी नेतृत्वाची तर अशी अवस्था आहे की आज जर स्वत: माओ-त्से-तुंग जिवंत असता तर त्याला देखील या विचारवंतांनी 'माओवाद' शिकवायला मागेपुढे पाहिले नसते. बुद्धिमान व्यक्ती विशिष्ट विचारांनी अंध झाली की तिची गणना वेड्यातच करावी लागते. सर्व जगाने अगदी चीनने सुद्धा अडगळीत फेकलेला 'माओवाद' भारतात रुजविण्याचा जो प्रयत्न येथील 'देशी' माओवादी विचारवंत करीत आहेत त्यावरून तरी हीच बाब सिद्ध होते. माओवादी पुस्तकी विचारांपेक्षा प्रत्यक्षातील 'माओवादी' राज्य' नक्की कसे असते, यावरूनच या तथाकथित 'क्रांतिकारकांचा' निकाल लागणार आहे. सुदैवाने आपल्या देशात असे माओवादी राज्य अस्तित्वात नाही, परंतु ज्या देशात माओवादी विचारांच्या लोकांनी राज्य केलेले आहे. तेथील सामान्य जनतेचा अनुभव सर्व जगालाच मार्गदर्शक ठरायला हरकत नाही. दक्षिण-पूर्व आशियातील कम्बोडिया हे एक असे दुर्दैवी राष्ट्र आहे की ज्याच्या कपाळी माओवादी राज्य व्यवस्थेचा भोग लिहिला होता. माओवाद्यांच्या राजवटीत सामान्य माणसांची स्थिती निश्चित कशी असते हे समजून घ्यावयाचे असल्यास कम्बोडियातील पॉल पॉटच्या राक्षसी राजवटीची माहिती प्रत्येकाला असलीच पाहिजे.

पॉल पॉटचे खरे नाव सालोथ सार असे होते. त्याचा जन्म दि. १९ मे १९२५ रोजी एका सधन शेतकरी कुटुंबात झाला होता. तरुण असतानाच तो कम्युनिस्ट पक्षात दाखल झाला. भूमिगत असतानाच्या काळात त्याचे नाव पॉल पॉट ठेवल्या गेले व त्याच नावाने तो जगाच्या इतिहासात कुप्रसिद्ध झाला. कम्बोडियाच्या उत्तरेकडील डोंगराळ, घनदाट जंगलाने व्याप्त प्रदेशात अनेक वर्ष भूमिगत राहून त्याने सशस्त्र संघर्ष केला व अखेरीस दि. १७ एप्रिल १९७५ रोजी पॉल पॉटच्या लाल सेनेने नॉम्ह पेन या राजधानीच्या शहरात प्रवेश केला.

कम्बोडियाला 'शेतकऱ्याचे राष्ट्र' करणे या उद्देशासाठी नॉम्ह पेन व इतर सर्व प्रमुख शहरातील लोकसंख्येला दूरच्या ग्रामीण भागातील शेतांवर मजुरी करण्यास पाठविण्यात आले. एकट्या नॉम्ह पेन या शहराचीच लोकसंख्या पंचवीस लाख असावी. देशातील शहरे अक्षरश: रिकामी करण्यात आलीत. सर्वच शहरांमधील शाळा-कॉलेज, बँका, दुकाने व सर्व संस्था बंद करण्यात आल्यात. अगदी दवाखाने व इस्पितळे देखील बंद करण्यात आली. अत्यवस्थ स्थितीतील रुग्णांना जागेवरच गोळ्या घालून मारून टाकण्यात आले व इतर रुग्ण व डॉक्टरांना शेतात मजुरीसाठी रवाना केले गेले. शहरे ताब्यात घेताच तेथील सर्व सनदी अधिकारी, पोलिस व लष्करी अधिकारी व त्यांच्या कुटुंबीयांना ठार मारण्यात आले. पत्रकार, शिक्षक, प्रोफेसर, वकील, न्यायाधीश वा तत्सम बुद्धिवंत वर्गाची तात्काळ सरसकट कत्तल करण्यात आली. माओवादी क्रांतीच्या असंख्य शत्रूंची कत्तल करण्यात दारूगोळा उगाच वाया जाऊ नये, म्हणून सहसा कुऱ्हाडीनेच लोकांना ठार करण्यात येत असे. भारतातील 'माओवादी क्रांतिकारक' देखील गरीब आदिवासींना आजही कुऱ्हाडीनेच ठार करतात त्यामागे त्यांची हीच 'महान' परंपरा आहे, हे लक्षात घेणे आवश्यक आहे.

कुटुंब व्यवस्था-

शहरे रिकामी करताना जेव्हा जनतेला ग्रामीण भागात पाठविण्यात आले तेव्हा मुद्दाम कुटुंबातील प्रत्येक व्यक्तीला वेगवेगळ्या ठिकाणी पाठविले. देशातील एका भागात वडील मजुरी करतील, तर आई शेकडो मैल दूर दुसऱ्या भागात, मुलगा एकीकडे तर मुलगी दुसरीकडे मजुरी करणार. कुटुंबातील प्रत्येकाला दुसऱ्यापासून तोडून देशातील संपूर्ण कुटुंबव्यवस्थाच मोडून काढली गेली आणि लक्षावधी लोकांना गुलामासारखे श्रमछावण्यांमध्ये पाठविण्यात आले.

शेतांमध्ये काम करीत असताना तेथील परिस्थिती अत्यंत भयानक होती. बेदम मारहाण करून लोकांकडून दिवस-रात्र काम करून घेण्यात येत असे. ज्या व्यक्ती अशक्त होऊन काम करू शकणार नाही त्यांना लगेच मारून टाकण्यात येत असे. अति श्रम, उपासमार व रोगराईमुळे लक्षावधी कम्बोडियन नागरिकांचा मृत्यू झाला. या श्रमछावण्यांमध्ये विना खटला तात्काळ मृत्युदंड देण्याचे सर्वाधिकार पॉल पॉटच्या सैनिकांना

दिलेले होते. स्त्रियांनी अलंकार घातले तर मृत्युदंडाची शिक्षा, कोणी आपल्या धर्माचे पालन करेल तरी मृत्युदंडा शिक्षा, नातेवाईकाच्या मृत्यूचा शोक केला तरी मृत्युदंडाची शिक्षा, सर्वात कमाल म्हणजे एखाद्या व्यक्तीने जर चष्मा लावला असेल तर ते बुद्धिवंताचे लक्षण समजून त्यालाही मृत्युदंडाची शिक्षा देण्यात येत अस धर्म व्यवस्था-

कम्बोडियातील माओवाद्यांच्या राज्यात धर्म व धर्मसंस्थांची पूर्ण विल्हेवाट लावली गेली. जवळपास ८५ टक्के कम्बोडियन समाज बौद्ध धर्माचा अनुयायी होता. १९७५ पूर्वी माओवाद्यांनी धर्मसंस्थांच्या कारभारात ढवळाढवळ केली नव्हती, परंतु सत्ता हातात घेताच बौद्ध भिख्खू व संघावर वरवंटा फिरविला गेला. अंदाजे पन्नास हजार बौद्ध भिख्खूंना 'सामाजिक गोचीड' अशी संज्ञा देऊन त्यापैकी अनेक प्रमुख भिख्खूंना ठार करण्यात आले व हजारो इतरांना श्रमछावणीत धाडले गेले. मंदिरे, चर्च व पॅगोडा उद्ध्वस्त केले गेलीत. बौद्ध मूर्तींचे चेहरे विद्रूप केले गेलेत व पॅगोडांचा उपयोग गोदाम व कारागृह म्हणून केला गेला. बौद्ध, ख्रिस्ती, मुस्लिम व्यक्ती आपल्या धर्माचे पालन करताना दिसला तर त्याला मृत्युदंडाची शिक्षा देण्यात येत असे. धर्माला अफूची गोळी म्हणणाऱ्या कट्टर माओवादी विचारसरणीतून कम्बोडियातून बौद्ध धर्माचे नामो निशाण मिटविण्याचे सर्वच प्रयत्न केले गेलेत.

अर्थव्यवस्था-

कम्बोडियातील माओवादी अर्थव्यवस्था कशी होती, हे पाहणे आवश्यक आहे. चलन व चलनी नोटांवर बंदी घालण्यात आली आणि सर्व व्यवहार 'वस्तू-विनिमय' पद्धतीने केले जावे, असे फर्माने निघाले. विशिष्ट प्रमाणात तांदळाची देवाण-घेवाण करून वस्तूंचे मूल्य दिले जाऊ लागले.

कोणत्याही प्रकारच्या संपत्तीच्या वैयक्तिक मालकीवर बंदी घालण्यात आली आणि शेतमालाच्या जमिनीची मालकी काढून घेण्यात आली. सर्व शेती सरकारजमा करून शेतमालकांना एका क्षणात शेतमजूर करण्यात आले. सर्वत्र सरकारी सामूहिक शेती सुरू करण्यात आली. दिवसरात्र अपरिमित कष्ट केल्यानंतर रात्री मिळणारे जेवण इतके निकृष्ट असे की काही काळातच अशक्तपणा येत असे. भयंकर मारहाण, अति श्रम, निकृष्ट अन्नामुळे होणारे कुपोषण यामुळे अगणित लोक निरनिराळ्या रोगांमुळे मृत्युमुखी पडले. शेतांमध्ये प्रेतांचे खच पडले आणि शेवटी देशभरात जागोजागी मानवी कवट्यांचे ढिगारे जमले.

राजकीय व्यवस्था-

सामान्य नागरिकांना कोणतेच राजकीय स्वातंत्र्य नव्हते. फक्त एकच राजकीय पक्ष अस्तित्वात होता. तो म्हणजे 'कम्बोडियन कम्युनिस्ट पक्ष.' ज्याचा सर्वेसर्वा होता पॉल पॉट. पक्षांतर्गत विरोधकांची सरसकट कत्तल करण्यात येत असे. एप्रिल १९७५ नंतर पॉल पॉटचे जुने सहकारी हू युऑन व हू निम यांचे त्याच्याशी वैचारिक मतभेद झाले म्हणून त्या दोघांचा अनन्वित छळ करून नंतर मारून टाकण्यात आले. हा मॉक हा पॉटचा विश्वासू सहकारी होता, त्याला आदेश देऊन, ससैन्य, देशाच्या पूर्व, पश्चिम, उत्तरेस पाठवून तेथील आपल्याच पक्षातील विरोधकांना शोधून, वेचून ठार मारण्यात आले.

१७ एप्रिल १९७५ ते डिसेंबर १९७८ या तीन वर्षे आठ महिन्यात कम्बोडियातील १० लाख लोकांची हत्या केली गेली. हे पॉल पॉट व त्याचा सहकारी कियु सांफान यांनी स्वत: मान्य केले; तर ॲम्नेस्टी इंटरनॅशनलने आपल्या अहवालात, १४ लक्ष लोकांची कत्तल झाली असे म्हटले. नंतरच्या कम्बोडियन सरकारने हा मृत्यूचा आकडा २० लाख होता, असा निष्कर्ष काढला.

कम्बोडियाच्या एकूण लोकसंख्येच्या २० ते २५ टक्के लोकांना पॉल पॉटच्या माओवादी राजवटीने मारून टाकले, असे म्हणणे चूक ठरणार नाही. फक्त ३ वर्षे आठ महिने इतक्या अल्प काळात एखाद्या देशाच्या १/४ लोकसंख्येच्या मृत्यूस कारण ठरणे, हा मानवी इतिहासातील विक्रम पॉल पॉटच्या राजवटीत घडला आहे आणि तोही मध्ययुगीन काळात नव्हे तर आजपासून फक्त ३० वर्षांपूर्वी. मृत्यूच्या या तांडवामुळे कम्बोडियात जागोजागी मानवी सांगाडे पडलेले दिसत व ठिकठिकाणी मानवी कवट्यांचे उंचच उंच ढिगारे रचलेले आढळून येत.

या माओवादी राजवटीत प्रत्येक कुटुंब उद्ध्वस्त झाले. बौद्ध धर्मसंस्था नष्ट झाल्यात, राजकीय प्रशासकीय चौकट मोडून गेली. अर्थव्यवस्था मातीत मिळाली. एकंदरीतच संपूर्ण देश देशोधडीला लागला. कम्बोडियातील सभ्य आणि सुसंस्कृत समाज कायमचा नष्ट होण्यापासून वाचला तो केवळ व्हिएतनाम सरकारने केलेल्या लष्करी कारवाईमुळे. १९७८-७९ मध्ये झालेल्या कारवाईमुळे पॉल पॉट व त्याच्या सैन्याने चक्क पळ काढला आणि जिवंत राहिलेल्या उरल्यासुरल्या कम्बोडियन नागरिकांची एकदाची सुटका झाली.

पॉल पॉटच्या या भयंकर नरसंहारामुळे त्यावेळी जगात हाहाकार झाला. त्याच्या विरोधात जगभरातून घृणा व तिरस्काराची लाट उसळली आणि जगाच्या इतिहासात सर्वात राक्षसी राजवटीपैकी एक म्हणून पॉल पॉटच्या माओवादी राजवटीची नोंद झाली. या सार्वत्रिक बदनामीला आपण व आपली 'चळवळ' बळी पडू नये म्हणून आजचे माओवादी सरळ म्हणतात की, पॉल पॉट हा माओवादी कम्युनिस्ट नव्हताच. पण त्यांचे असे म्हणणे धडधडीत खोटे आहे. ऑक्टोबर १९७७ च्या पहिल्या आठवड्यात स्वत: पॉल पॉट आणि त्याचे दोन

वरिष्ठ सहकारी इंग सॅरे व वॉर्न वेट यांनी पेकिंगला भेट दिली व जाहीरपणे कबुली दिली की कम्बोडियन क्रांतीवर माओवादी विचारांचा पगडा होता. या जाहीर कबुली व आभारप्रदर्शनानंतर काही महिन्यातच चीनने कम्बोडियाला मोठ्या प्रमाणात लष्करी मदत केली होती.

माओवादी राज्यकारभाराचा एक भयंकर नमुना म्हणजे पॉल पॉटची राजवट. त्याबद्दल आता तरी शंका असू नये.

भारतात माओवादी विचारांचा प्रसर करण्याचा जोमाने प्रयत्न केला जात आहे. माओवादी समाजव्यवस्था निश्चित कशी राहणार याबद्दल ते कधीच स्पष्ट कल्पना देत नाही, फक्त प्रस्थापित व्यवस्थेतील दोषच काढीत बसतात. शेतकऱ्यांच्या आत्महत्या, विजेचे भारनियमन, खैरलांजी हत्याकांड समस्यांच्या आधारे लोकांना हिंसाचार करण्यास प्रोत्साहन दिले जाते. अज्ञानामुळे  अनेक लोक माओवाद्यांच्या कारस्थानाला बळी पडतात. परंतु माओवादी गटांच्या हातात जेव्हा सत्तेची सूत्रे येतात तेव्हा त्या माओवादी राज्यात समाजाची निश्चित कशी दशा होते याचा अंदाज येण्यासाठी पॉल पॉटच्या राजवटीचे एक लहानसे उदाहरण सर्वांनाच विचार करण्यास पुरेसे आहे.

भारतातील प्रस्थापित व्यवस्थेत अनेक दोष आहेत हे तर मान्यच आहे, हे दोष दूर करून एक निर्दोष समाजव्यवस्था उभी करण्याचा प्रयत्न करावा की अति हिंसाचारावर विश्वास ठेवणाऱ्या माओवाद्यांच्या हातात सत्ता देऊन आपल्याही देशात जागोजागी मानवी कवट्यांच्या राशी उभ्या कराव्या, याचा निर्णय सामान्य जनतेने आता केलाच पाहिजे. माओवादी हिंसाचार आम नागरिकांच्या जीवन-मृत्यूचा प्रश्न होऊन बसला आहे म्हणून साहजिकच निर्णय देखील सामान्य माणसानेच घेणे आवश्यक आहे.

मलिंद महाजन